31-03-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 03/30/2025 10:17 PM Page 1



महामार्ग कामगार मूलभूत सुविधांपासून वंचित पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



दिल्लीचा हैदराबादर दणदणीत विजय पान ४ वर

वेर्णा, सोमवार, ३१ मार्च २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 207 | Verna, | facebook.com/dainikherald | Monday 31 March 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### हिमाचल प्रदेशात भूस्खलन; ६ जणांचा

**कुल्लू, दि. ३०** : हिमाचल प्रदेशातील धार्मिक पर्यटन स्थळ असलेल्या मणिकरण येथील गुरुद्वाराजवळील टेकडीवरून रविवारी संध्याकाळी ४ वाजताच्या सुमारास भूस्खलन झाले. जोरदार वादळामुळे एक मोठे झाड कोसळल्याने हे भूस्खलन झाले. रस्त्यावर आधीच उभ्या असलेल्या सुमारे ६ वाहनांवर झाड कोसळले. ज्यामुळे या वाहनांमध्ये प्रवास करणाऱ्या एकूण ६ जणांचा मृत्यू झाला. याशिवाय, काही लोक ढिगाऱ्याखाली दबले असण्याची शक्यता आहे. प्रशासन आणि पोलिस बचाव कार्यात गुंतले आहेत. अपघातानंतर काही लोक बराच वेळ वाहनांमध्ये अडकले होते, ज्यांना पोलिसांनी बाहेर काढले. जखमींची संख्या अद्याप स्पष्ट झालेली नाही. स्थानिक लोकांच्या मदतीने जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे आणि गंभीर जखमींना कुल्लू येथे रेफर करण्यात आले आहे. रस्त्यावरील ढिगारा हटवल्यानंतर गाडलेल्या लोकांचा शोध सुरू आहे. प्रत्यक्षदर्शींच्या मते, भूस्खलनानंतर घटनास्थळी गोंधळ उडाला. कुल्लूचे डीसी तोरुल एस रवीश म्हणाले की, ६ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. जिल्हा प्रशासन आणि पोलिस घटनास्थळी आहेत, मदत आणि बचाव कार्य सुरू आहे.

### टोंगा येथे भूकंप; त्सुनामीचा इशारा

**नायपिडा, दि. ३०** : पॅसिफिक महासागरातील टोंगा बेटांवर रविवारी ७.१ तीव्रतेच्या भूकंपाच्या धक्के बसले आहेत. ज्यामुळे या भागात त्सुनामीचा इशारा जारी करण्यात आला आहे, अशी माहिती यूएस जिओलॉजिकल सर्व्हेने दिली आहे. यूएसजीएसने दिलेल्या माहितीनुसार, टोंगाच्या मुख्य बेटापासून उत्तर पूर्वेला १००० किलोमीटर अंतरावर या भूकंपाचे केंद्र होते. पॅसिफिक त्सुनामी वॉर्निंग सेंटरने इशारा दिला आहे की, भूकंपाच्या केंद्रापासून ३०० किलोमीटर अंतरावरील किनारपट्टीवर धोकादायक लाटांचा परिणाम दिसू शकतो.
या भूकंपामुळे टोंगाच्या किनारपट्टीवर भूकंपाच्या केंद्रापासून ३०० किलोमीटर पर्यंत धोकादायक त्सुनामी लाटा येण्याची शक्यता आहे, असे अमेरिकेच्या त्सुनामी वॉर्निंग सिस्टमने म्हटले आहे.
दरम्यान या शक्तिशाली भूकंपानंतर झालेल्या नुकसानीची अद्याप कोणतीही माहिती समोर आली नाही. तर जर्मन रिसर्च सेंटर फॉर जिओसायन्सेसने हा भूकंप १० किमी खोलीवर झाला असल्याचे म्हटले आहे.

### नेपाळमध्ये हिंसक निदर्शने, दोघांचा मृत्यू

**काठमांडू, दि. ३०** : शुक्रवारी नेपाळमध्ये राजेशाहीच्या मागणीसाठी झालेल्या हिंसक निदर्शनांत दोन जणांचा मृत्यू झाला. हिंसाचार भडकवणे, खासगी मालमत्तेचे नुकसान करणे आणि जाळपोळ करणे या आरोपाखाली पोलिसांनी १०५ जणांना अटक केली आहे.
यामध्ये राष्ट्रीय प्रजातंत्र पक्षाचे उपाध्यक्ष रवींद्र मिश्रा, सरचिटणीस धवल शमशेर राणा यांचा समावेश आहे. याशिवाय स्वागत नेपाळ, शेफर्ड लिंबू आणि संतोष तमांग यांसारख्या राजेशाहीचे समर्थन करणाऱ्या कार्यकर्त्यांसह १७ इतर नेत्यांचाही समावेश आहे.
गृह मंत्रालयाच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निषेधाचे मुख्य आयोजक नवराज सुबेदी यांना नजरकैदेत ठेवण्यात आले आहे. त्याच वेळी, या निदर्शनाचे मुख्य कमांडर दुर्गा परसाई यांचा शोध घेतला जात आहे.

#### हवामान

कमाल : २८ किमान : २३
आर्द्रता : ७५

#### बाजार भाव

सोने : ₹ ७१,७८० (१० ग्रॅम)
चांदी : ₹ ८५,१०० (१ किलो)

#### शेअर मार्केट

सेन्सेक्स : ८२,३६५.७७↑ (२३१.१६)
निफ्टी : २५,२३५.९० ↑ (८३.९५)

# भाजप-मगो युती तुटण्याचे संकेत

## प्रियोळमधून मुख्यमंत्र्यांनी दिला 'चालते व्हा' चा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड :

**फोंडा, दि. ३० : मुख्यमंत्र्यानी प्रियोळ मतदारसंघावर भाजपातर्फे जाहीर दावा करून आगामी निवडणुकांच्या आधी भाजप - मगो युती तुटणार असल्याचे संकेत दिले आहेत . प्रियोळ येथे झालेल्या भाजपा कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलताना मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आगामी विधानसभा निवडणुकीत प्रियोळ मतदारसंघात भाजपाचाच उमेदवार निवडणूक लढवणार असून ज्यांना हे मान्य नाही त्यांनी युतीमधून आताच चालते व्हावे अशा स्पष्ट शब्दात मगोपला नाव न घेता इशारा दिला आहे . मुख्यमंत्र्यांच्या या विधानामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.**

२०२७ च्या विधानसभा निवडणुकीसाठी दीड वर्षांचा अवधी बाकी असतानाही, फोंड्यातील राजकीय तापमान चांगलेच वाढले आहे. मुख्यमंत्री सावंत यांनी प्रियोळ झालेल्या भाजप कार्यकर्ता मेळाव्यात मित्रपक्ष एमजीपीचे नाव न घेता स्पष्ट शब्दांत इशारा दिला की, प्रियोळ मतदारसंघ हा भाजपकडेच राहणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे . यामध्ये कोणतीही तडजोड होणार नाही . ज्यांना हे मान्य नाही त्यांनी युतीमधून आताच चालते व्हावे. भाजपचे सरकार असल्यामुळेच गोव्याचा विकास झाला आहे हे कार्यकर्त्यांनी लक्षात घ्यावे. तसेच, त्यांनी केंद्र सरकारच्या पाठिंब्याचा पुनरुच्चार करत गोव्यातील विकासासाठी निधी मिळत राहील, असेही स्पष्ट केले.

एमजीपीचे अध्यक्ष दीपक ढवळीकर यांनी अलिकडेच प्रियोळ न निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रियोळमधली राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे .या पार्श्वभूमीवर आलेल्या मुख्यमंत्र्यांच्या या जाहीर इशाऱ्याबद्दल मगोचे नेते आणि ऊर्जामंत्री सुदिन ढवळीकर यांना विचारले असता त्यांनी कार्यकर्त्यांना खूश ठेवण्यासाठी मुख्यमंत्र्याना असे बोलावेच लागते असं म्हणून मुख्यमंत्र्यांच्या या विधानातली हवा काढून टाकण्याचा प्रयत्न केला. इतकेच नाही तर प्रियोळ मतदार संघाचा निर्णय स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी , गृहमंत्री अमित शाह , भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डा आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस घेतील असे सांगून एकप्रकारे मुख्यमंत्र्यांना आणि भाजपच्या स्थानिक नेत्यांना डिवचले आहे. त्यामूळे येत्या काळात भाजप - मगो वाद आणखी भडकण्याची शक्यता आहे.

# कोमुनिदाद संस्थांमध्ये सरकारी हस्तक्षेप वाढणार

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**मडगाव, दि. ३०** : ज्या कोमुनिदाद मध्ये अद्याप निवडणुका झालेल्या नाहीत, त्या ठिकाणी मामलतदार किंवा संयुक्त मामलतदारांची नियुक्ती करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाबाबत दक्षिण गोव्यातील विविध कोमुनिदादीमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. नुकत्याच सुधारित कलम १८१-अ च्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला असून, त्यामुळे अशा परिस्थितीत सरकारी हस्तक्षेपाचा मार्ग मोकळा झाला आहे.

दक्षिण गोव्यातील कोमुनिदाद प्रशासक गणेश बर्वे यांनी या दुरुस्तीची अंमलबजावणी करण्याच्या प्रक्रियेस प्रारंभ केला आहे. मात्र, काही समुदाय नेत्यांनी सरकारी नियंत्रण वाढल्यास स्वायत्ततेवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचे सांगून सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

मडगाव कोमुनिदाद अध्यक्ष सॅव्हियो कोरिया यांनी सरकारी हस्तक्षेपाआधी समुदायांतर्गत सक्षम व्यक्तींची नियुक्ती करण्यावर भर द्यावा, असे मत व्यक्त केले. ही सुधारणा सरकारला निवडणुका न घेणाऱ्या कोमुनिदादींवर नियंत्रण मिळवण्याची परवानगी देते, मात्र हा उपाय शेवटचा पर्याय असावा. व्यवस्थापकीय समित्यांमध्ये कार्य करण्यास इच्छुक आणि सक्षम व्यक्तींची ओळख पटवण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे कोरिया यांनी सांगितले. तसेच, जर ही सुधारणा योग्य विचार न करता लागू करण्यात आली, तर पुढील तिमाहीत अर्ध्याहून अधिक कोमुनिदाद थेट सरकारी प्रशासनाच्या अखत्यारित येऊ शकतात, असा इशाराही त्यांनी दिला.

पान २ ▶




# स्मार्ट सीटी कामांच्या विलंबामुळे नागरिक त्रस्त

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. ३०** : इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेड पुन्हा एकदा स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत सुरू असलेल्या प्रकल्पांची अंतिम मुदत पूर्ण करण्यात अपयशी ठरली आहे. गेल्या सात वर्षांपासून सुरू असलेले हे प्रकल्प अद्यापही अपूर्ण असून, अनेक ठिकाणी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

हेराल्ड मीडियाच्या पाहणीत असे आढळले की डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर रस्ता आणि १८ जून रोडसह अनेक रस्त्यांचे काम अद्याप सुरू झालेले नाही. डॉन बॉस्को उच्च माध्यमिक शाळेजवळील खंदक भरण्यात आला असला तरी ते योग्य प्रकारे डांबरीकरण करण्यात आलेले नाही. सांत इनेजमधील वाय जंक्शन तसेच ताड माड येथील रस्ता अत्यंत खराब स्थितीत आहे. स्थानिक कामगारांच्या म्हणण्यानुसार, येथे आणखी चेंबर बांधण्यासाठी किमान दहा दिवस लागतील, त्यानंतर रस्ता पूर्ण केला जाईल. भाटलेमध्येही काम अव्यवस्थित सुरू आहे, तर कॅफे भोसले ते मस्करेन्हास बिल्डिंग परिसरातील चौक अपूर्ण रस्ते आणि ड्रेनेज यंत्रणेच्या समस्येमुळे अडथळ्यात आले आहेत.



पान २ ▶

# लिथियमसाठी युक्रेन-अमेरिका खनिज करार होणार?

## युक्रेनमधील काही लिथियम साठे सध्या रशियाच्या ताब्यात

**कीव, दि. ३० :**

युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी अमेरिकेसोबत खनिज करार करण्यास आपला देश तयार असल्याचे जाहीर केले आहे. हे विधान त्यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि उपराष्ट्रपती जेडी व्हॅन्स यांच्याशी झालेल्या वादानंतर काही दिवसांनी केले आहे. मात्र, या कराराच्या अटी आणि तपशील अद्याप स्पष्ट करण्यात आलेले नाहीत.



अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प युक्रेनमधील दुर्मिळ खनिज संसाधनांवर लक्ष केंद्रित करत आहेत. यामध्ये बॅटरी आणि उच्च-तंत्रज्ञान उत्पादनांमध्ये वापरले जाणारे महत्त्वाचे घटक समाविष्ट आहेत. विशेषत: लिथियम, जो इलेक्ट्रिक वाहने, मोबाईल फोन आणि संगणकासाठी वापरण्यात येणाऱ्या बॅटरींसाठी अनिवार्य आहे. मात्र, युक्रेनमधील काही लिथियम साठे सध्या रशियाच्या ताब्यात असल्याने या कराराची अंमलबजावणी कितपत सहज होईल, याबाबत प्रश्नचिन्ह आहे.

युक्रेनच्या भूवैज्ञानिक सेवेनुसार, देशात सुमारे पाच लाख टन लिथियमचा साठा आहे आणि हा युरोपमधील सर्वात मोठा साठा मानला जातो. तथापि, अजूनही युक्रेनने यापैकी कोणतेही खनिज उत्खनन सुरू केलेले नाही. अमेरिकेच्या भूवैज्ञानिक सर्वेक्षणानुसार २०२१ मध्ये जगभरात सुमारे ७१ दशलक्ष टन लिथियम साठा असल्याचा अंदाज होता, त्यातील बहुतांश साठे अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, चिली आणि चीनमध्ये आहेत.

अमेरिकेत स्वतःच्या लिथियमच्या मोठ्या साठ्यांवर भर दिला जात आहे. २०२३ मध्ये नेवाडा येथे ३६ दशलक्ष टन लिथियमचा साठा सापडल्याचे समोर आले. मात्र, अमेरिकेत लिथियमच्या उत्खनन आणि उत्पादनावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आवश्यक आहे. सध्या अमेरिका आपला बहुतांश लिथियम चिली आणि अर्जेंटिनामधून आयात करते.

चीन जगातील लिथियमचा १६.५ टक्के साठा बाळगून आहे आणि ६० टक्के लिथियम शुद्धीकरणावर नियंत्रण ठेवते.

पान २ ▶

